जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# इंडो तैवान कुलगुरू परिषदेत डॉ. देवानंद शिंदे यांचा सहभाग

कोल्हापूर टाइम्स टीम

तैवान येथे आयोजित 'इंडो-तैवान कुलगुरू परिषदे'साठी मंगळवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे रवाना झाले.

तैवान सरकार, तैपेई इकॉनॉमिक अँड कल्चरल सेंटर इन इंडिया (टीईसीसी) यांचा शिक्षण विभाग आणि भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) यांच्या संयुक्त विद्यमाने तैवानच्या राष्ट्रीय त्सिंग हुआ विद्यापीठात २१ जून रोजी 'इंडो-तैवान कुलगुरू परिषद' होत आहे. परिषदेत सहभागी होण्यासाठी एआययूचे अध्यक्ष प्रा. पी. बी. शर्मा आणि सरचिटणीस प्रा. फुरकान कमर यांच्या नेतृत्वाखाली देशातील विविध विद्यापीठांच्या ११ कुलगुरूंचे शिष्टमंडळ रवाना झाले आहे. शिष्टमंडळात राज्य अकृषी विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून कुलगुरू शिंदे यांचा समावेश आहे.

परिषदेत भारत आणि तैवान या दोन देशांमधील उच्चशैक्षणिक सहसंबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने तसेच आंतरराष्ट्रीय उच्चशिक्षण क्षेत्रांतील विविध प्रवाहांचा वेध घेण्याच्या दृष्टीने सर्वंकष चर्चा करण्यात येणार आहे. कुलगुरू परिषदेत सहभागी होण्याबरोबरच भारतीय कुलगुरूंचे शिष्टमंडळ महत्त्वाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक ठिकाणांना भेटी देणार आहे.



**'इंडो-तैवान आंतरराष्ट्रीय कुलगुरू परिषदेच्या निमित्ताने तैवानमधील उच्चशिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करण्याची एक महत्त्वाची संधी चालून आली आहे. उभय देशांतील संबंध दृढ करण्यास याची मदत होईल.'**

**– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू**

जनसंपर्क कक्ष
20 JUN 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू परिषदेसाठी डॉ. शिंदे तैवानला रवाना

प्रतिनिधी
कोल्हापूर

तैवान सरकार, तैपेई इकॉनॉमिक एन्ड कल्चरल सेंटर इन इंडिया (टीईसीसी) यांचा शिक्षण विभाग आणि भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) यांच्या संयुक्त विद्यमाने तैवानच्या राष्ट्रीय त्सिंग हुआ विद्यापीठात येत्या २१ जून रोजी 'इंडो-तैवान कुलगुरू परिषद' आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेत सहभागी होण्यासाठी एआययूचे अध्यक्ष प्रा. पी. बी. शर्मा आणि सरचिटणीस प्रा. फुरकान कमर यांच्या नेतृत्वाखाली देशातील विविध विद्यापीठांच्या ११ कुलगुरूंचे शिष्टमंडळ रवाना झाले आहे. या शिष्टमंडळात राज्य अकृषी विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा समावेश आहे.

या परिषदेत भारत आणि तैवान या दोन देशांमधील उच्चशैक्षणिक सहसंबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने तसेच आंतरराष्ट्रीय उच्चशिक्षण क्षेत्रातील विविध प्रवाहांचा वेध घेण्याच्या दृष्टीने विविध सत्रांत चर्चा करण्यात येणार आहे. कुलगुरू परिषदेत सहभागी होण्याबरोबरच भारतीय कुलगुरूंचे शिष्टमंडळ नॅशनल तैपेई युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, नॅशनल त्सिंग हुआ युनिव्हर्सिटी, आदी ठिकाणांना भेटी देणार आहेत.

## तैवानची उच्च शिक्षणव्यवस्था अभ्यासण्याची संधी



इंडो-तैवान आंतरराष्ट्रीय कुलगुरू परिषदेच्या निमिताने तैवानमधील उच्चशिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करण्याची एक महत्त्वाची संधी मिळाली आहे. तैवान येथील उच्चशिक्षण संस्था, विद्यापीठे, संशोधन व विकासाची यंत्रणा त्यांमधील संधी आदी बाबींची माहिती घेणे आणि उभय देशांतील शैक्षणिक व सांस्कृतिक संबंध दृढ करण्याच्या दृष्टीने हा अभ्यास दौरा महत्त्वाचा ठरेल.

– कुलगुरू डॉ. शिंदे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUN 2018
सकाळ

# डॉ. देवानंद शिंदे तैवानला रवाना



**कोल्हापूर, ता. १९ :** 'इंडो-तैवान कुलगुरू परिषदे'साठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे तैवानला रवाना झाले आहेत. तैवान सरकार, तैपेई इकॉनॉमिक अँन्ड कल्चरल सेंटर इन इंडिया (टीईसीसी) यांचा शिक्षण विभाग आणि भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) यांच्या संयुक्त विद्यमाने तैवानच्या राष्ट्रीय त्सिंग हुआ विद्यापीठात येत्या २१ जूनला ही परिषद होत आहे. परिषदेत सहभागी होण्यासाठी एआययूचे अध्यक्ष प्रा. पी. बी. शर्मा आणि सरचिटणीस प्रा. फुरकान कमर यांच्या नेतृत्वाखाली देशातील विविध विद्यापीठांच्या ११ कुलगुरूंचे शिष्टमंडळ रवाना झाले आहे. शिष्टमंडळात राज्य अकृषी विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून डॉ. शिंदे यांचा समावेश आहे. परिषदेत भारत आणि तैवान या दोन देशांमधील उच्च शैक्षणिक सहसंबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने तसेच आंतरराष्ट्रीय उच्च शिक्षण क्षेत्रांतील विविध प्रवाहांचा वेध घेण्याच्या दृष्टीने विविध सत्रांत सर्वंकष चर्चा करण्यात येणार आहे. डॉ. शिंदे म्हणाले, ''परिषदेच्या निमित्ताने तैवानमधील उच्च शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करण्याची एक महत्त्वाची संधी चालून आली आहे. तैवान येथील उच्च शिक्षण संस्था, विद्यापीठे, संशोधन व विकासाची यंत्रणा आणि उभय देशांतील शैक्षणिक व सांस्कृतिक संबंध दृढ करण्याच्या दृष्टीने हा अभ्यास दौरा महत्त्वाचा ठरेल.''

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUN 2018
पुण्यनगरी

# आंतरराष्ट्रीय कुलगुरू परिषदेसाठी डॉ. देवानंद शिंदे तैवानला रवाना

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**



तैवान येथे आयोजित करण्यात आलेल्या इंडो-तैवान कुलगुरू परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे सोमवारी तैवानला रवाना झाले. तैवान सरकार, तैपेई इकॉनॉमिक अँड कल्चरल सेंटर इन इंडिया (टीईसीसी) यांचा शिक्षण विभाग आणि भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) यांच्या संयुक्त विद्यमाने तैवानच्या राष्ट्रीय त्सिंग हुआ विद्यापीठात येत्या २१ जून रोजी इंडो-तैवान कुलगुरू परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत सहभागी होण्यासाठी एआययूचे अध्यक्ष प्रा. पी. बी. शर्मा आणि सरचिटणीस प्रा. फुरकान कमर यांच्या नेतृत्वाखाली देशातील विविध विद्यापीठांच्या ११ कुलगुरूंचे शिष्टमंडळ रवाना झाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा[illegible]
20 JUN 2018
पुढारी

## कुलगुरू परिषदेसाठी

# डॉ. देवानंद शिंदे तैवानला रवाना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



तैवान येथे आयोजित करण्यात आलेल्या इंडो-तैवान कुलगुरू परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे नुकतेच तैवानला रवाना झाले.

तैवान सरकार, तैपेई इकॉनॉमिक अँड कल्चरल सेंटर इन इंडिया (टीईसीसी) यांचा शिक्षण विभाग आणि भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) यांच्या संयुक्त विद्यमाने तैवानच्या राष्ट्रीय त्सिंग हुआ विद्यापीठात २१ जून रोजी इंडो-तैवान कुलगुरू परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत सहभागी होण्यासाठी एआययूचे अध्यक्ष प्रा. पी.बी. शर्मा आणि सरचिटणीस प्रा. फुरकान कमर यांच्या नेतृत्वाखाली देशातील विविध विद्यापीठांच्या ११ कुलगुरूंचे शिष्टमंडळ रवाना झाले आहे. या शिष्टमंडळात राज्य अकृषी विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा समावेश करण्यात आला आहे.

या परिषदेत आंतरराष्ट्रीय उच्चशिक्षण क्षेत्रातील विविध प्रवाहांचा वेध घेण्याच्या दृष्टीने विविध सत्रांत सर्वंकष चर्चा करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUN 2018
तरुण भारत

# विद्यापीठातील १३ कर्मचाऱ्यांना बढती

- सुधाकर भोसले व उदय पाटोळे अधीक्षकपदी
- सर्व कर्मचाऱ्यांना विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने नियुक्तीपत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील शिक्षकेत्तर १३ कर्मचाऱ्यांना सोमवारी बढती देण्यात आली. यामध्ये सुधाकर भोसले, उदय पाटोळे यांची अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने सर्व कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यामुळे विद्यापीठ परिसरातील कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

शिवाजी विद्यापीठातील १३ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची अधीक्षक, सहाय्यक अधीक्षक, कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा परिचर आदी पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये वरिष्ठ सहाय्यक अनिल पाटील यांची सहाय्यक असिस्टंटपदी तर कनिष्ठ सहाय्यक नेहा खोत, सचिन कोळेकर, विजय ढवळे यांची वरिष्ठ सहाय्यकपदी नियुक्ती करण्यात आली. वाहन चालक प्रल्हाद गंगाधरे, माळी सुरेश वाघवेकर, शिपाई अश्विनी गंगाधरे, शिपाई राकेश डोंगरे, शिपाई रविंद्र पाटील यांची कनिष्ठ सहाय्यकपदी तर शिपाई प्रकाश वास्कर यांची प्रयोगशाळा परिचरपदी नियुक्ती करण्यात आली. या सर्व कर्मचाऱ्यांना विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने नियुक्तीपत्र देण्यात आले.

## कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला यश

शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अनेक मागण्यांसाठी आंदोलन सुरू आहे. यामध्ये एखादा कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याठिकाणी त्वरीत दुसऱ्या कर्मचाऱ्याला पदोन्नती मिळावी, अशी एक मागणी होती. विद्यापीठ प्रशासनाने उशिरा का असेना यापैकी एक मागणी मान्य करून १३ कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिला आहे, याचा आनंद असला तरी भविष्यात वेळ न लावता कर्मचाऱ्यांना त्वरीत बढती मिळावी.

**– बाबा सावंत, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष**

20 JUN 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# म...म...मोडीचा...!

## चार विषयांचा डिप्लोमा होणार सुरू, ऑगस्टपासून सुरुवात



**संदीप खांडेकर :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : मोडी लिपी, अॅक्युप्रेशर, आहार व समुपदेशन विषयांत करिअर करणाऱ्यांना खूशखबर आहे. यंदापासून शिवाजी विद्यापीठात या विषयांचा एक वर्षाचा पदवी प्रमाणपत्र (डिप्लोमा) अभ्यासक्रम सुरू होत आहे.

या विषयांत डिप्लोमा सुरू करणारे विद्यापीठ राज्यातील पहिले असून ऑगस्टपासून अभ्यासक्रमास सुरुवात होत आहे. महसूल, न्याय, सामाजिक प्रश्न, देवस्थान, वतने व राजकीय पत्रव्यवहारासंदर्भातील जुनी कागदपत्रे मोडी लिपीत आहेत. या लिपीचे जाणकार हाताच्या बोटावर मोजण्याइतपत असल्याने ही लिपी वाचण्यात अडचणी आहेत. नव्या पिढीला पंधरा अथवा एक महिन्याच्या कालावधीत जाणकारांकडून लिपीचे प्रशिक्षण दिले जाते. मात्र हा कालावधी लिपी शिकण्यास पुरेसा नसल्याचे खुद्द त्यांचेच मत आहे. सातत्यपूर्ण अभ्यास या विषयांसाठी आवश्यक आहे. त्यामुळेच मोडीसह अॅक्युप्रेशर, आहार व समुपदेशन विषयांचे परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. वर्षभराच्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना विषयांच्या उजळणीला वेळ मिळणार आहे. त्यातून त्यांचा विषयांचा सखोल अभ्यासही होईल. प्रत्येक विषयासाठी ४० इतकी प्रवेश क्षमता असून, प्रवेश शुल्क दहा हजार रूपये इतके आहे.

संचालक डॉ. सुमन बुवा म्हणाल्या, "आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे कौशल्याधारीत ७१ अभ्यासक्रम चालविले जातात. योग व निसर्गोपचार, योग शिक्षण, योगा, इव्हेंट मॅनेजमेंट, रेडिओ जॉकी, मानवी हक्क, सूत्रसंचालक, रोपवाटिका व उद्यान कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, संभाषण कौशल्य, बालवाडी शिक्षिका, समाजकार्य व मोडी लिपीचे कोर्सेस या विभागाद्वारे चालविले जातात, तर उर्वरित कोर्सेचे विद्यापीठाशी संलग्नीत सुमारे ७० महाविद्यालयांतर्फे शिकविले जातात."

> **मोडी लिपीतील अक्षरे लक्षात ठेवणे अवघड आहे. ही अक्षरे विद्यार्थ्यांकडून घोटवून घेणे महत्त्वाचे आहे. एक वर्षाच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्याला लिपीचे परिपूर्ण ज्ञान देणे शक्य आहे.**
> – **वसंत सिंघण,** (मोडी लिपी तज्ज्ञ)

20 JUN 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माध्यमांतील संधींचा खजिना

डॉ. शिवाजी जाधव

सीआयआय आणि बोस्टन कन्सल्टिंग ग्रूप (बीसीजी) च्या अंदाजानुसार, सध्या देशातील माध्यम आणि मनोरंजन उद्योग १लाख ३५ हजार कोटींच्या घरात आहे. तो नजीकच्या काळात म्हणजे २०२२ पर्यंत ४ लाख ५० हजार कोटींपर्यंत जाईल.

## जाहिरात, प्रसिद्धी विभाग

मुद्रीत, इलेक्ट्रॉनिक तसेच वेब माध्यमांसाठी जाहिराती आवश्यक असतात. किंबहुना, जाहिरातींच्या महसूलावरच माध्यमांची भिस्त अवलंबून असते. त्यामुळे जाहिराती तयार करण्यासाठी आवश्यक तांत्रिक कौशल्यांची पूर्तता केल्यास या क्षेत्रात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. शिवाय आऊटडोअर पब्लिसिटीमध्येही उत्तम करिअर करता येते. बिल बोर्ड, होर्डिंग, बसेसवरील जाहिराती यासह दृक्-श्राव्य जाहिरातींमध्येही करिअर करता येते. स्थानिक पातळीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत या क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी वेळोवेळी निर्माण होत आहेत.

जाहिरातीसाठी संहिता लेखन, फोटोग्राफी, डिझाईन अशा विविध संधी यामध्ये आहेत. कल्पकता आणि सादरीकरणाची उत्तम कला असेल तर यात चांगले करिअर होऊ शकते. यासाठी बहुतेक विद्यापीठात आणि खासगी मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमध्ये जाहिरातीचे स्वतंत्र अभ्यासक्रम शिकवले जात आहेत.

## जनसंपर्क

जनसंपर्क हे करिअरचे आणखी एक चांगले क्षेत्र आहे. प्रतिमा निर्मिती हे जनसंपर्काचा मुख्य उद्देश आहे. समाजात एखादी व्यक्ती, संस्था व शासनाची चांगली प्रतिमा निर्माण करण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करुन, अपेक्षित परिणाम साध्य करण्याचे हे कौशल्य आहे. खासगी, सार्वजनिक तसेच शासकीय पातळीवर सर्वच आस्थापनांना जनसंपर्काची निकड भासते. राजकीय, उद्योग, सहकार अशा अनेक क्षेत्रात जनसंपर्क अधिकाऱ्यांची गरज असते. केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत येणाऱ्या प्रसिद्धी विभागात आणि राज्याच्या प्रसिद्धी विभागात जनसंपर्क अधिकाऱ्यांची अनेक पदे वरचेवर भरली जातात. शिवाय अनेक खासगी संस्थांतही जनसंपर्क अधिकारी किंवा जनसंपर्क व्यवस्थापकांची भरती केली जाते. पत्रकारितेत किमान तीन वर्षांचा अनुभव आणि विविध माध्यमे



उत्तरार्ध

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

हाताळण्याचे कौशल्य असलेल्या उमेदवारांना जनसंपर्क अधिकारी म्हणून प्राधान्य दिले जाते. बहुतेक सर्वच विद्यापीठे आणि काही खासगी शिक्षण संस्थांत यासंदर्भातील प्रशिक्षण दिले जाते.

## माहिती आणि जनसंवाद

उत्तम संवाद कौशल्य असणाऱ्या आणि माध्यमांच्या उपयोगाची समज असणाऱ्या उमेदवारांसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर काम मिळवून देणारे माहिती आणि जनसंवाद हे क्षेत्र आहे. विविध शासकीय योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच लोकांकडून प्रतिसाद मिळविण्यासाठी जनसंवाद क्षेत्रात काम करणाऱ्या घटकांना रोजगार मिळत आहे. अनेक आंतरराष्ट्रीय संस्था, युनिसेफसारख्या जागतिक संघटनांसह अनेक संस्थांमध्ये संवाद तज्ज्ञांची गरज असते.

भारत सरकार, राज्य सरकारे यांनाही अशा तज्ज्ञांची गरज भासते. ग्रामीण विकास, योजनांची अंमलबजावणी, सर्व्हे अशा अनेक कामांसाठी मोठा रोजगार निर्माण होत आहे. यासाठी माहिती आणि जनसंवाद या विषयात तरबेज असलेल्या उमेदवारांना मोठी संधी मिळत आहे.

## माध्यम संशोधन

माध्यमात संशोधन ही आणखी एक चांगली संधी आहे. अनेक माध्यमांना तत्काळ लोकांना माहिती पुरवावी लागते. यासाठी माहितीचे संकलन करुन ठेवणे आणि ती माहिती सातत्याने अपडेट करणे आवश्यक आहे. अनेक माध्यमे विविध विषयांवर संशोधन करुन ती माहिती लोकांपर्यंत पोहोचवतात. अशा वेळी माध्यमांमध्ये संशोधनासाठी रोजगार निर्मिती होऊ शकते. अनेक स्वयंसेवी संस्था किंवा शासकीय पातळीवर संशोधनाचे काम अविरत सुरु असते.

शासनाच्या विविध विभागात संशोधनाचे अनेक प्रकल्प सुरु असतात. माध्यमांची उपयुक्तता, त्याची गरज आणि अशा अनुषंगिक गोष्टींवरही नियमितपणे संशोधन सुरु असते. माध्यमांतील बदल, नवे तंत्रज्ञान अशा अनेक गोष्टी विचारात घेता संशोधन कायमपणे सुरु राहणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे या क्षेत्रात खूप संधी निर्माण होत आहे.

**(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागात सहायक प्राध्यापक आहेत.)**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUN 2018
पुढारी

# अभ्यासक्रमांची गुणवत्ता यादी लवकरच

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

यंदाच्या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांतील प्रथम वर्ष एम.ए., एमएस्सी (भुगोल), एम.एस्सी. (सर्व विषय) एम. ए. (सर्व विषय), एम.कॉम., एल.एल.एम., एमसीए (सायन्स), एमएस्सी (टेक), गणित, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटकडील सर्व अभ्यासक्रम, बी.लिब., एम.लिब., बी.जे., एम.जे., एम. ए. मास कम्युनिकेशन या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबतचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. परंतु, काही तांत्रिक अडचणींमुळे विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर केलेल्या प्रवेश फेऱ्यांचे वेळापत्रक सुधारित करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने कळवण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUN 2018
लोकमत

# प्रवेश प्रक्रियेतील वेळापत्रकात बदल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने एम.ए., एम.एस्सी., एम.कॉम., आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात तांत्रिक कारणामुळे बदल केला आहे. या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक विद्यापीठाने जाहीर केले होते. मात्र, काही तांत्रिक अडचणीमुळे या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला आहे. प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रशासनाने प्रसिद्ध केले असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUN 2018
तरुण भारत

# विद्यापीठात प्लास्टिक बंदीवर उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर :** प्लास्टीक बंदी अधिसूचनेतील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामपंचायतस्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी गुरूवारी २१ रोजी सकाळी ११.३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या लोक कला केंद्रामध्ये, एक दिवशीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेस जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच सन्माननीय सदस्य व खातेप्रमुख उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेस उपायुक्त (विकास), पुणे विभाग, पुणे हे मार्गदर्शन करणार असून, सर्वांनी या कार्यशाळेस उपस्थित रहावे, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शिनी मोरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा
20 JUN 2018
लोकमत

## उद्या कार्यशाळा

कोल्हापूर : प्लास्टिक बंदी अधिसूचनेतील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टिकोनातून जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामपंचायतस्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी उद्या, गुरुवारी सकाळी ११.30 वाजता शिवाजी विद्यापीठाच्या लोक कला केंद्र येथे एकदिवशीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. यावेळी जि.प. अध्यक्ष शौमिका महाडिक यांच्यासह पदाधिकारी, सदस्य व खातेप्रमुख उपस्थित राहणार आहेत.